**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०४ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशभरात आज नौदल दिवस साजरा; राष्ट्रपती, पंतप्रधानांकडून नौदलातल्या जवानांना शुभेच्छा.**
2. **देशाचा इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातली उलाढाल २०३० पर्यंत २० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचेल- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती.**
3. **महाराष्ट्राच्या 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेने जागतिक उच्चांक गाठत केली गिनीज बुकमध्ये नोंद.**
4. **सलग तिसऱ्या दिवशी भंडारा जिल्हा विदर्भात सर्वात थंड.**

नौदल दिवस

आज देशभरात नौदल दिवस साजरा करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारतीय नौदलाच्या शिस्त, समर्पण आणि राष्ट्रीय सुरक्षेतल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचं कौतुक केलं. उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी नौदल देशाच्या सागरी शक्तीचं प्रतीक असल्याचं म्हटलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयएनएस विक्रांतवरील जवानांसोबतची दिवाळी संस्मरणीय असल्याचा उल्लेख करत नौदलाच्या शौर्य आणि कर्तव्यनिष्ठेची प्रशंसा केली. **.......**

***मैं नौसेना परिवार के सभी सदस्यों को नेवी डे पर विशेष रूप से बधाई देता हूँ। आपके लिए ही कहा गया है चलो नई मिसाल हों बड़ों नया कमाल हो, झुको नहीं, रुको नहीं बढ़े चलो बढ़े चलो समंदर में हमारी नेवी देश की समुद्री सीमाओं और व्यापारिक हितों की सुरक्षा के लिए तैनात रहें। आज चाहे ऑफशोर पेट्रोल वेसल हो। सबमरीन्स हो या एयर का क्राफ्ट कॅरींअर्स हो, आज भारत की नौसेना की ताकत अभूतपूर्व गति से बढ़ रही है।***

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नौदल दिनानिमित्त शुभेच्छा देत भारतीय नौदलाच्या शौर्य आणि सागरी सुरक्षेतल्या योगदानाचं कौतुक केलं. मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे आयोजित कार्यक्रमात व्हाइस

ॲडमिरल राहुल गोखले यांनी गौरव स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना आदरांजली वाहिली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

देशाची  इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातली उलाढाल २०३० पर्यंत २० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचेल, अशी माहिती केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. येत्या ५ वर्षात ५ कोटींहून अधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता या उद्योगात असल्याचं त्यांनी सांगितलं.

***Indian E-market potential is of twenty lakh crores by 2030 with ₹ one crore annual sales of vehicle creating five crore  new jobs by 2030 four hundred plus startups in electric 2 Wheelers sale increased by 21% since 2024. Lithium is very important. I remember when we have taken a decision for an electric vehicle, the cost of the lithium ion battery was $150 per kilowatt per hour, but now it is presently coming to $55 per kilowatt per hour.***

आसाममध्ये झालेल्या पावसामुळे महामार्गाचं नुकसान झालं असून त्याव्यतिरिक्त महामार्गासंबंधीच्या तक्रारींनुसार कारवाई करण्यात आली आहे. तसंच, महामार्ग दुरुस्तीचं कामही युद्धपातळीवर सुरू असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरावेळी स्पष्ट केलं. आसाममध्ये टोलवसुली होत असली तरी रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याचा प्रश्न काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी लोकसभेत उपस्थित केला होता.

उत्पादन वाढीचा दर

अर्थव्यवस्थेसंदर्भातली जागतिक स्तरावरची मानांकन संस्था 'फिचनं' चालू आर्थिक वर्षात भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला असून तो पूर्वीच्या ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांच्या अंदाजापेक्षा अधिक आहे. अलीकडेच केलेल्या कर सुधारणेमुळे ही वाढ होईल असंही फिचनं म्हटलं आहे. खाजगी ग्राहकांकडून करण्यात येणारा खर्च आणि वस्तू आणि सेवा करातल्या सुधारणांमुळे हे शक्य होणार आहे.

धरती आबा

केंद्र सरकारन धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष योजनेअंतर्गत देशभरातल्या आदिवासी गावांच्या विकासासाठी ८० हजार कोटी रुपये राखीव ठेवले आहेत, अशी माहिती आदिवासी व्यवहार मंत्री जुएल ओराम यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. आरोग्य, शिक्षण तसंच वीजपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी ६३ हजारांहून जास्त गावांमधे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, असं जुएल ओराम यावेळी म्हणाले.

प्रकाश आबिटकर

राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अस्थायी सेवाकाळातील 'सेवाखंड क्षमापित' करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून 150 वैद्यकीय अधिकाऱ्यांना या निर्णयाचा थेट लाभ मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते 'सेवाखंड क्षमापित' पत्रांचे वितरण करण्यात आले. या निर्णयामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना विविध आर्थिक आणि प्रशासकीय लाभ मिळून आरोग्य सेवेत गुणात्मक वाढ होईल, असा विश्वास मंत्री आबिटकर यांनी व्यक्त केला.

एकसमान कार्यपद्धती

दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्ती आणि पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाचा कायदेशीर हक्क प्रभावीपणे मिळावा, यासाठीच्या पद सुनिश्चिती प्रक्रियेसाठी राज्य शासनानं एकसमान कार्यपद्धती तयार केली आहे. ही प्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि पारदर्शक करण्याच्या हेतूनं तज्ज्ञ समितीची पुनर्रचना देखील करण्यात आली आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या या समितीत अंध-अल्पदृष्टी, श्रवणदोष, अस्थिव्यंगता, स्वमग्नता, विशिष्ट शिक्षण अक्षमता आणि मानसिक आजार अशा विविध प्रवर्गांतील किमान एका तज्ज्ञाचा समावेश असेल.

मागेल त्याला सौर कृषिपंप

महाराष्ट्राच्या 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेन जागतिक उच्चांक गाठत गिनीज बुकमध्ये नोंद झाली आहे. महावितरणने एका महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषिपंप बसवून हा विक्रम केला आहे. या कामगिरीचा प्रमाणपत्र प्रदान सोहळा उद्या ५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा एमआयडीसी मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांना

फक्त १० टक्के हिस्सा भरावा लागतो, तर अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांसाठी तो फक्त ५ टक्के आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

डिजिटल ७/१२, ८-अ आणि फेरफार उतारे कायदेशीरदृष्ट्या वैध ठरवण्याचा निर्णय राज्य सरकारन घेतला आहे. या निर्णयामुळे डिजिटल ७/१२ ला अधिकृत मान्यता मिळेल, फक्त १५ रुपयात अधिकृत उतारा उपलब्ध होईल, तलाठ्याच्या सही-स्टॅम्पची गरज राहणार नाही. डिजिटल स्वाक्षरी, QR कोड, आणि १६ अंकी पडताळणी क्रमांक असलेले ७/१२, ८-अ आणि फेरफार उतारे सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग आणि न्यायालयीन कामांसाठी पूर्णपणे वैध असतील. हा निर्णय शेतकरी, जमीनधारक आणि सामान्य नागरिकांसाठी सुविधा, पारदर्शकता आणि वेगवान सेवा यांचा नवा अध्याय असेल, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं.

प्रतिभा धानोरकर

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबरला मुंबईच्या चैत्यभूमी आणि नागपूरच्या दीक्षाभूमी येथे लाखो भाविक दाखल होत असतात. या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी समृद्धी महामार्गावरील टोलमधून पूर्ण सूट देण्याची मागणी केली आहे. महापरिनिर्वाण दिनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर भाविक खासगी वाहनांनी प्रवास करतात, त्यामुळे टोलमुक्त सुविधा दिल्यास आर्थिक ताण कमी होऊन प्रवास सुलभ होईल, अस त्यांनी नमूद केल आहे. दरम्यान, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनाही पत्र पाठवून ५ डिसेंबरला बल्लारपूरहून मुंबईसाठी आणि ७ डिसेंबरला मुंबईहून बल्लारपूरसाठी विशेष रेल्वे चालवण्याची मागणी करण्यात आली आहे.

रथयात्रा महोत्सव

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यात बेलोना इथं आज श्री मारुती मंदिर देवस्थान तर्फे श्री हनुमंताचा प्रगट दिन वार्षिक महोत्सव सोहळा उत्साहान संपन्न होत आहे. तीन दिवसाच्या या रथयात्रा महोत्सवात हजारोंच्या संख्येन भक्त दर्शनासाठी येत असून, विदर्भातील हनुमंताची पंढरी म्हणून ओळख असलेल्या बेलोना इथं उत्सवाच्या माध्यमान आध्यात्मिक कार्यक्रम तसंच जनजागृती पर कार्यक्रम देखील घेण्यात येत आहे.

हवामान

विदर्भातील भंडारा जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी आज किमान तापमान १० अंश सेल्सिअस असून त्या पाठोपाठ गोंदिया जिल्ह्यात देखील १० पूर्णांक २ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. गेले तीन दिवस भंडारा जिल्ह्यात थंडीची लाट कायम आहे. याशिवाय नागपूर इथं किमान तापमान ११ अंश सेल्सिअस तर यवतमाळ आणि तसंच वाशीम इथं बारा पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. पश्चिम विदर्भातील उर्वरित जिल्ह्यात तापमान १३ ते १४ अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

आंतरराष्ट्रीय नेमबाजी विश्वचषक -ISSF

कतारची राजधानी दोहा इथं आजपासून ISSF आंतरराष्ट्रीय नेमबाजी विश्वचषकाच्या अंतिम स्पर्धेला सुरुवात होत आहे. या स्पर्धेत विश्वविजेता नेमबाज सम्राट राणा याच्या नेतृत्वाखाली १५ भारतीय नेमबाजांचा संघ सहभागी झाला आहे. या संघात मनु भाकर, सुरुची सिंह यांसारखे आघाडीचे नेमबाज आहेत.

*****